॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

ax : (02462) 215572 NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT website: srtmun.ac.in
hone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र.: रासेयो/२०२६–२७/३१ दिनांक : २९/०५/२०२६

**परिपत्रक**

**प्रति,**
**मा.प्राचार्य/रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,**
**रा.से.यो.राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये, व रा.से.यो. पथक विद्यापीठ परिसर,**
**प्रस्तुत विद्यापीठ.**

**विषय: दिनांक १० जून "नेत्रदान दिन" निमित्त विद्यापीठामध्ये व संलग्नित महाविद्यालया मध्ये नेत्रदान जनजागृती अभियान व नेत्र तपासणी शिबीर आयोजित करणे बाबत.**

संदर्भ: मा. डॉ. मिलिंद काळे, राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी, रा.से.यो., महाराष्ट्र शासन. मुंबई यांचे जा.क्र. रासेयो–२०२६/प्र.क्र.४३/रासेयो कक्ष. दि. १८ मे २०२६.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये मा. डॉ. मिलिंद काळे, राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन. मुंबई यांनी **दिनांक १० जून हा "नेत्रदान दिन"** म्हणून संपूर्ण जगामध्ये साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून समाजामध्ये नेत्रदानाबाबत जागरूकता निर्माण करणे तसेच विद्यार्थ्यांच्या नेत्र आरोग्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्यानुषंगाने राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विद्यापीठ व रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालये खालील प्रमाणे उपक्रम आयोजित करण्याबाबत कळविले आहे.

**१) नेत्रदान जनजागृती अभियानांतर्गत मोफत नेत्र तपासणी शिबीर ( प्रसिध्द नेत्रतज्ञ/ रूग्णालयांच्या सहकार्याने)**
**२) नेत्रदान नोंदणी मोहिम (Eye Donation Pledge Drive) व विद्यार्थ्यांमध्ये व नागरिकांमध्ये नेत्रदानाचे महत्व याबाबत मार्गदर्शन.**
**३) सोशल मिडियाद्वारे व्यापक प्रसार व जनजागृती कारणे.**

तरी त्यानुषंगाने रा.से.यो. संलग्निनत सर्व महाविद्यलये व रा.से.यो. पथक विद्यापीठ परिसर, यांना सुचित करण्यात येते की, उपरोक्तपणे निर्देशित केलेल्या सुचनेनुसार आपल्या महाविद्यालयामध्ये दिनांक १० जून २०२६ रोजी जास्तीत जास्त विद्यार्थी व जनमाणसांचा या उपक्रमात/जनजागृती अभियानात सहभाग वाढविण्यात यावा. सदर उपक्रम कालावधी मध्ये नेत्ररोगतज्ञांचे नेत्रदान संबधी व्याख्यान आयोजित करून विद्यार्थ्यांमध्ये/कर्मचा–यांमध्ये पुरेशी जनजागृती करण्यात यावी व प्रत्यक्ष नेत्रदानाचे फॉर्म भरून घेण्यात यावेत व विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागात सादर करावेत, ही विनंती.

(**टिप:** कृपया जे जे संलग्नित महाविद्यालय आपल्या महाविद्यालयात उपरोक्त कार्यक्रम साजरे करणार आहेत अशा महाविद्यालयांनी दिनांक ०५/०६/२०२६ पर्यंत डॉ. मारोती गायकवाड संचालक रा. से.यो. यांच्या व्हाट्सअप वर आपल्या महाविद्यालयांचे नावे पाठविण्यात यावे सदरील महाविद्यालयांची यादी शासनास कळवावयाची आहे.)

**डॉ. मारोती गायकवाड**
**संचालक रा.से.यो.**
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड

**प्रत माहितीस्तव:**
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:**
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.